राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य या योजनेसाठी नवीन लेखाशीर्ष उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र. १३६ /२४ स
मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२
दिनांक:-१६ ऑक्टोबर, २०१७

<u>संदर्भ:-</u> १) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र. ५ /२४ स, दिनांक १० जानेवारी, २०१७
२) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र. ५ /२४ स, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७

<u>प्रस्तावना:-</u>

खरीप हंगाम २०१६-२०१७ मध्ये राज्यात सोयाबीनच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे बाजारातील आवक वाढून सोयाबीनच्या दरात घसरण झालेली होती. त्यामुळे राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, दिनांक १०/१/२०१७ अन्वये माहे ऑक्टोबर २०१६ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रु. २००/- व जास्तीत जास्त २५ क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर केले आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ८/८/२०१७ अन्वये राज्यातील परवानाप्राप्त खाजगी बाजार व थेट पणन अनुज्ञाप्ती परवानाधारकांना माहे ऑक्टोबर २०१६ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांचा सोयाबीन अनुदान योजनेत समावेश करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर अनुदानाचा लाभ सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना देण्यासाठी प्रस्तुत योजनेसाठी नवीन लेखाशीर्ष उपलब्ध करुन घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान अदा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नवीन लेखाशीर्ष उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

मागणी क्र. व्ही-२

२४२५ सहकार

१९५ सहकारी संस्थांना अर्थसहाय्य

(०१) सहकारी संस्थांना अर्थसहाय्य

(०१)(०३) राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य (अनिवार्य)

३३ अर्थसहाय्य

Demand No. V-2

2425 Co-operation

195 Assistance to co-operatives

(01) Assistance to co-operatives

(01)(03) Assistance to Soyabean Producing Farmers in the state (committed)

33 Subsidies

२. सदर शासन निर्णय महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयाचा क्र. ख.वि/चा-१/सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग/यूओआर-६७/२०१७-१८/६३४ दिनांक ४/१०/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३०४/अर्थ-१३, दिनांक ७/१/२०१७ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१६१३४५१६२७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Sunanda M Ghadyale

Digitally signed by Sunanda M Ghadyale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-operation, Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd89208cbc27b202c96467165ac5bc9643515d80ba9edecaf650dad6e8311b45, serialNumber=c5adff2513f33afa9ed70c79c5a4636204d8bb4040bf2c6c2470d0f20d8dc79d, cn=Sunanda M Ghadyale
Date: 2017.10.16 13:42:03 +05'30'

(सुनंदा मो.घडयाळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

२. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे
४. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
५. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
६. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
८. मा. राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव(पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
११.अध्यक्ष/सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती(सर्व)
१२.महालेखापाल, महाराष्ट्र-१ /२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर,
१३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
१५.वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प-११, मंत्रालय, मुंबई-३२
१६.कार्यासन अधिकारी, १७ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७.निवड नस्ती २४ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.